संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवर असलेल्या नाशिक परिक्षेत्रातील सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता यांच्या जिल्हा कार्यालयातील १७३ पदांना मुदतवाढ.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : डीपीपी-०३१९/प्र.क्र.१०१/पोल-१०
दुसरा मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २० मार्च, २०१९

वाचा :

१. शासन निर्णय गृह विभाग क्रमांक एमआयएस-२००३/प्र.क्र.१४८/पोल-१०, दि.१२.१०.२०१०
२. शासन निर्णय गृह विभाग क्रमांक डीपीपी-२०१२/प्र.क्र.११२/पोल-१०, दि.२८.०५.२०१३
३. शासन निर्णय गृह विभाग क्रमांक डीपीपी-०११८/प्र.क्र.१४/पोल-१०, दि.२७.०३.२०१८
४. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक, दि.०७.०९.२०१८
५. संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. अस्थायी पदे/६७/१८५३/२०१८, दि.०६.०९.२०१८
६. शासन निर्णय गृह विभाग क्रमांक डीपीपी-०११८/प्र.क्र.१४/पोल-१०, दि.१६.१०.२०१८
७. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक, दि.२१.०२.२०१९
८. संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. अस्थायी पदे/६७/४१०/२०१९, दि.२७.०२.२०१९

शासन निर्णय :

संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या नियंत्रणाखालील एकूण ११६८ पदांचा आकृतीबंध मान्य करण्यात आलेला आहे. तसेच शासन निर्णय क्र:-डीपीपी-२०१२/ प्र.क्र.११२/पोल-१०, दिनांक २८.०५.२०१३ नुसार संचालनालयाच्या आस्थापनेवर सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांची २९९ पदे निर्माण करण्यात आली आहेत. सदर पदांचा आकृतीबंधात समावेश करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यापैकी उपसंचालक, सरकारी अभियोग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांच्या नियंत्रणाखालील सोबतच्या **परिशिष्ट-ड** मधील जिल्हावार सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता यांच्या ५ जिल्हा कार्यालयातील **१७३ अस्थायी पदांना** गृह विभाग शासन निर्णय क्रमांक डीपीपी-०११८/प्र.क्र.१४/पोल-१०, दि.१६.१०.२०१९ अन्वये दिनांक २८.०२.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. आता सोबतच्या **परिशिष्ट-ड** मधील **१७३ अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०१९ ते दिनांक ३०.०९.२०१९ पर्यंत**च्या मुदतवाढीस या आदेशान्वये शासन मंजुरी देत आहे.

ही मुदतवाढ जी पदे ६ महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त आहेत त्या पदांना लागू होणार नाहीत. तसेच शासनाने सदरहू पदे नष्ट करण्याचे आदेश यापुर्वी दिलेले असतील अशा पदांना मुदतवाढ लागू होणार नाही.

२. अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील पदांच्या आढाव्यास उच्च स्तरीय सचिव समितीने दिनांक १३.०१.२००५ रोजी मान्यता दिलेली असून, संदर्भ क्रमांक १ येथील दिनांक १२.१०.२०१० च्या शासन निर्णय अन्वये उपरोक्त ११६८ पदांचा आकृतीबंध विहित करण्यात आलेला आहे. सदर आकृतीबंधात या पदांचा समावेश आहे. तसेच शासन निर्णय क्र:- डीपीपी-२०१२/प्र.क्र.११२/पोल-१०, दिनांक २८.०५.२०१३ नुसार संचालनालयाच्या आस्थापनेवर सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांची २९९ पदे निर्माण करण्यात आली आहेत. सदर पदांचा आकृतीबंधात समावेश करण्याची कार्यवाही सुरु आहे.

३. यासाठी होणारा खर्च गृह विभाग बी-१, "२०१४-न्यायदान ११४-विधी सल्लागार व समुपदेशी, (००)(०१) संचालक सरकारी अभियोग, संगणक संकेतांक क्रमांक २०१४० ०२९ ०१ वेतन " या लेखाशिर्षाखालील सन २०१९-२० या वित्तीय वर्षातील मंजूर अनुदानातून भागविण्यत यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक पदनि-२०१६/ प्र.क्र.८/१६/आपुक, दि.२१.०२.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२०१२४५२३९९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Pramod Vithoba Kadam

Digitally signed by Pramod Vithoba Kadam
DN: CN = Pramod Vithoba Kadam, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Home Department
Date: 2019.03.20 12:56:20 +05'30'

(प्रमोद वि. कदम)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. उपसंचालक, सरकारी अभियोग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक
३. सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, नाशिक/धुळे/नंदुरबार/जळगाव/अहमदनगर
४. (मार्फत : उपसंचालक, सरकारी अभियोग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक/धुळे/नंदुरबार/जळगाव/अहमदनगर
८. वित्त विभाग (वित्तीय सुधारणा-१), मंत्रालय, मुंबई
९. निवड नस्ती (कार्यासन पोल-१०), मंत्रालय मुंबई

परिशिष्ट “ड”

सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, नाशिक परिक्षेत्रातील जिल्हा कार्यालये-५

अ.क्र.	जिल्हाचे नाव	पदनाम	पदसंख्या
१	नाशिक (नाशिक शहर, नाशिक ग्रामीण)	सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता	१
		अतिरिक्त सरकारी अभियोक्ता	२
		सहाय्यक सरकारी अभियोक्ता	२९
		निम्मश्रेणी लघुलेखक	१
		वरिष्ठ लिपिक	१
		लिपिक-टंकलेखक	११
		शिपाई	१
		एकूण	**४६**

अ.क्र.	जिल्हाचे नाव	पदनाम	पदसंख्या
२	धुळे	सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता	१
		सहाय्यक सरकारी अभियोक्ता	११
		निम्मश्रेणी लघुलेखक	१
		वरिष्ठ लिपिक	१
		लिपिक-टंकलेखक	५
		शिपाई	१
		एकूण	**२०**

अ.क्र.	जिल्हाचे नाव	पदनाम	पदसंख्या
३	नंदुरबार	सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता	१
		अतिरिक्त सरकारी अभियोक्ता	१
		सहाय्यक सरकारी अभियोक्ता	७
		निम्मश्रेणी लघुलेखक	१
		वरिष्ठ लिपिक	१
		लिपिक-टंकलेखक	३
		शिपाई	१
		एकूण	**१५**

अ.क्र.	जिल्हाचे नाव	पदनाम	पदसंख्या
४	जळगाव	सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता	१
		अतिरिक्त सरकारी अभियोक्ता	१
		सहाय्यक सरकारी अभियोक्ता	२२
		निम्मश्रेणी लघुलेखक	१
		वरिष्ठ लिपिक	१
		लिपिक-टंकलेखक	१२
		शिपाई	१
		एकूण	**३९**

अ.क्र.	जिल्हाचे नाव	पदनाम	पदसंख्या
५	अहमदनगर	सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता	१
		अतिरिक्त सरकारी अभियोक्ता	१
		सहाय्यक सरकारी अभियोक्ता	३२
		निम्मश्रेणी लघुलेखक	१
		वरिष्ठ लिपिक	१
		लिपिक-टंकलेखक	१६
		शिपाई	१
		एकूण	**५३**

Pramod Vithoba Kadam

Digitally signed by Pramod Vithoba Kadam
DN: CN = Pramod Vithoba Kadam, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Home Department
Date: 2019.03.20 12:56:49 +05'30'

(प्रमोद वि. कदम)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन